पुणे शहर पोलीस

# दर्पण

जानेवारी २०२०

# उत्कृष्ट तपास

पुढारी – दि. १० जानेवारी, २०२०

# सराईत चोरट्याला पोलिसांनी पकडले

## २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल; ५ लाख १० हजारांचा किमती ऐवज जप्त

**पुणे : प्रतिनिधी**

हडपसर पोलिसांनी एका सराईत गुन्हेगाराला जेरबंद केले. अजयसिंग अर्जुनसिंग दुधानी (वय.२०,रा. सटवाईनगर मांजरी बुद्रुक) या सराईत गुन्हेगाराला जेरबंद केले आहे. दुधानी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, आत्तापर्यंत त्याच्यावर २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. घरफोड्या, वाहनचोरी आणि बसमधील प्रवाशांच्या किमती ऐवजावर हात साफ करण्यात तो सराईत आहे. या वेळी त्याच्या ताब्यातून सोन्याचे मंगळसूत्र, गंठण, नेकलेस, साखळी, रिंगा असे, ९५ ग्रॅम वजनाचे दागिणे व चॉकलेटी रंगाची ॲक्टीव्हा असा तब्बल ५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



अटक केलेल्या आरोपीसह हडपसर पोलिसांचे पथक.

हडपसर पोलिसांचे एक पथक पीएमपी बसमधील वाढत्या चोऱ्यांच्या अनुषंगाने गस्तीवर असताना कर्मचारी नितीन मुंढे व विनोद शिवले यांना पांढरे मळा हडपसर येथील कॅनालशेजारी असलेल्या रस्त्यावर नंबर नसलेल्या चॉकलेटी रंगाच्या दुचाकीवरील एक व्यक्ती रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना सोन्याचे दागिने विक्री करण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी परिसराची पाहणी करून सापळा लावला असता, दुधानी त्यांच्या जाळ्यात सापडला. त्याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी करत अंगझडती घेतली तेव्हा त्याच्या ताब्यात हा मुद्देमाल मिळून आला. अटक आरोपी दुधानी याचे वडील अर्जुनसिंग दुधानी देखील रेकॉर्डवरील अट्टल घरफोड्या व चोऱ्या करणारा गुन्हेगार आहे. सध्या तो मोक्का अंतर्गत येरवडा कारागृहामध्ये बंदीवान आहे.

ही कामगिरी अपर पोलिस आयुक्त सुनिल फुलारी, उपायुक्त सुहास बावचे, निरीक्षक रघुनाथ जाधव, गुन्हे निरीक्षक हमराज कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक संजय चव्हाण, कर्मचारी युसूफ पठाण, संपत औचरे, राजेश नवले,सैदोबा भोजराव, गणेश दवळी यांच्या पथकाने केली.

**प्रभात** – दि. १२ जानेवारी, २०२०

# पैसे लांबविणारा सराईत जेरबंद

## गुन्हे शाखेच्या पोलिसांची कामगिरी : ६६ हजार ८८० रुपये केले जप्त

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११-** पीएमपी बसमध्ये चढ-उतार करणाऱ्या प्रवाशांना हेरून हातचलाखीने त्यांच्या खिशातील पैसे लांबविणाऱ्या एका सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखेने अटक केली. त्याच्याकडून शहरातील विविध पोलीस ठाण्यात दाखल पाच गुन्हे उघडकीस आले असून ६६ हजार ८८० रुपये जप्त करण्यात आले आहेत.

सचिन सिद्धराम गायकवाड ( वय ३६, सर्वोदय कॉलनी, मुंढवा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. मागील काही महिन्यांपासून पीएमपी बसमध्ये चोरीचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः नगर रस्त्यावर हे प्रमाण सर्वाधिक असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मागील आठ दिवसांपासून नगर रस्त्यावरील विमानतळ, चंदननगर, येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बसस्टॉपवर साध्या वेश्यातील पोलिसांकडून गस्त घालण्यात येत होती. दरम्यान, बुधवारी दि. ८ रोजी चंदननगर बीआरटी बसस्टॉपवर पोलिसांच्या पथकाला आरोपी गायकवाड हा संशयितरीत्या वावरताना दिसला. बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांना धक्काबुक्की करून परत बसखाली उतरत असल्याचे दिसून आले. त्याच्या संशयित हालचालींमुळे त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. यावेळी त्याच्याकडे अस्ताव्यस्त ठेवलेले पन्नास हजार रुपये व एक मोबाइल मिळून आला. यानंतर केलेल्या चौकशीत तो मागील तीन वर्षांपासून या भागातील प्रवाशांना हेरून चोरी करत असल्याचे समोर आले. सदर आरोपीकडून शहरातील विश्रांतवाडी, कोंढवा, येरवडा आणि स्वारगेट येथील एकूण पाच गुन्हे उघडकीस आले आहेत.

---

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. २० जानेवारी, २०२०

# रिक्षा क्रमांकावरून काढला टोळीचा माग

म. टा. प्रतिनिधी, पुणे






**विमानातून येऊन करायचे चोरी**

**Pune Mirror - 22 January, 2019**

# Cops trace parents of abandoned twins

## The babies were found near Pashan lake on January 14

FILE PHOTO



Police arrested both parents of the babies

Archana.More
@timesgroup.com

TWEETS @Archana_Mirror

The Chaturshringi police have traced the parents of the newborn twins found dumped near Pashan lake on the morning of January 14. They've arrested the duo, who were in a live-in relationship.

The man is married to someone else, while the woman is a widow with three children from her marriage. Morning walkers had spotted the babies wrapped in a blanket after being drawn to them by their wails. They alerted the Chaturshringi police and it became an onerous task for the cops to track where the infants came from.

"We searched multiple nursing homes across the city to locate where the twins were born. Finally at Janani Nursing Home at Karvenagar, we learnt of the woman who'd given birth to a pair of twins. She'd submitted a fake address for the admission," informed senior inspector Anil Shewale, at the Chaturshringi police station.

According to the information culled by the cops, the woman was admitted to the hospital at 1 am on January 14 and delivered the babies by 4.10 am. Subsequent to that, by the morning she'd slipped away with the children, without informing anybody in the hospital. Police constables Prakash Avhad and Sachin Kamble who investigated the case got a tip-off that the woman was a resident of Wadgaon Budruk. "Already mother of three children she did not have the wherewithal to bring up the infants and decided to abandon them," Shewale told *Mirror*.

The couple have been booked under section 317 (exposure and abandonment of child under 12 years by parent or person in charge of it) of the Indian Penal Code, the officer added. The children were taken for check up to Sassoon General Hospital and later placed in the custody of Society of Friends of Sassoon Hospital.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. ३० जानेवारी, २०२०**

# तरुणीकडून उकळले अडीच लाख रुपये

**प्रेम प्रकरणावरून ब्लॅकमेल करणाऱ्या तरुणाला अटक**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्रेम प्रकरणाची माहिती कुटुंबीयांना सांगून बदनामी करण्याची भीती दाखवून तरुणीकडून अडीच लाख रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी समर्थ पोलिस ठाण्यात विनयभंग आणि खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत २४ वर्षीय तरुणीने तक्रार दिली. त्यानुसार पंकज रमाकांत गदादे (वय २६, रा. कर्वेनगर) याला अटक करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि आरोपी एकमेकांच्या ओळखीचे आहेत. आरोपी हा पीडित तरुणीचा पाठलाग करून सतत पैसे मागत होता. तसेच, पैसे दिले नाही, तर आपल्यात प्रेम प्रकरण सुरू असून, त्याची माहिती तरुणीच्या कुटुंबीयांना देण्याची धमकी देत होता. या भीतीने तरुणीने सप्टेंबर २०१८पासून आरोपीला अडीच लाख रुपये दिले. तरीही आरोपी तरुणीचा पाठलाग करून त्रास देत होता. त्यामुळे तरुणी गेल्या काही दिवसांपासून त्या आरोपीचा फोन घेत नव्हती. तसेच, त्याला भेटतदेखील नव्हती. त्यामुळे आरोपीने तरुणीला रामोशी गेट चौकाजवळ गाठले. तिला शिवीगाळ करून मारहाण केली. त्यानंतर तरुणीने पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानुसार आरोपीला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी समर्थ पोलिस अधिक तपास करत आहेत.

दरम्यान, भवानी पेठेत घरात घुसून अनोळखी व्यक्तीने तरुणीवर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी समर्थ पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार २१ वर्षीय तरुणीने तक्रार दिली असून, २७ वर्षांच्या अनोळखी तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी समर्थ पोलिस अधिक तपास करत आहेत.

**पुढारी** – दि. २५ जानेवारी, २०२०

# सहा लाखांचा ऐवज चोरणारा नोकर जेरबंद

## हडपसर पोलिसांची कारवाई

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

हडपसर परिसरातील एका प्रतिष्ठित व्यक्तीच्या घरी नोकरीस असलेल्या किरण अशोक गायकवाड (२२, रा. कानिफनाथ सोसायटी, मांजरी बुद्रुक) याने सहा लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. तीन वर्षांहून अधिक काळ नोकरीस असल्याने किरणला घरातील बारीकसारीक गोष्टींची माहिती होती.

यातूनच त्याने मालकाच्या किमती ऐवजावर डल्ला मारला. या प्रकरणी त्यास अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून २७० ग्रॅम सोन्याच्या कड्यासह सहा लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीनुसार, तपास पथकातील सहायक पोलिस निरीक्षक संजय चव्हाण यांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी त्याने पाळत ठेवून मालकाने गादीखाली ठेवलेले सोन्याचे कडे लंपास केल्याचे कबूल केले.

ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक संजय चव्हाण, सहायक पोलिस फौजदार युसुफ पठाण, कर्मचारी नितीन मुंढे, संपत औचरे, राजेश नवले, विनोद शिवले, सैदोबा भोजराव, गणेश दळवी, गोविंद चिवळे, शाहिद शेख, अकबर शेख, शशिकांत नाळे, विजय पवार यांच्या पथकाने केली.

**पुण्यनगरी** – दि. १६ जानेवारी, २०२०


# पर्वती टेकडीवर युवकाला लुटणाऱ्यास अटक

**चोरट्याने दात पाडल्याचे प्रकरण : २४ तासांच्या आत दत्तवाडी पोलिसांची कारवाई**

। पुणे : प्रतिनिधी

पर्वती टेकडीवर युवकावर चाकूने वार करीत त्याच्या जवळील मोबाइल हिसकावून नेणाऱ्या चोरट्यास दत्तवाडी पोलिसांनी २४ तासाच्या आत अटक केली. चोरट्याने केलेल्या हल्ल्यात युवकाचे तीन दात पडले होते. तसेच, हात आणि पाय फ्रॅक्चर झाला होता. स्वप्निल दत्ता आवळे (वय १९, धंदा मजुरी, रा. गल्ली क्र. ५, जय भवानी नगर, जनता वसाहत) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी मनोज तुकाराम बहुतुले (रा. गल्ली क्र.४१ मधला टप्पा, जनता वसाहत, पर्वती) याने फिर्याद दिली आहे.

फिर्यादी मनोज हा सोमवारी दुपारी ४ वाजण्याच्या पर्वती



टेकडीवर कार्तिक स्वामी मंदिराकडे जाणारे रोडचे कडेला असलेल्या जंगलातील भिंतीवर बसला होता. तेथे आलेल्या एकाने चाकूने हनुवटीवर वार करून मारहाण करीत मोबाइल आणि रोख रक्कम लुटून नेली होती. मारहाणीत मनोज यांचे तीन दात पडले आहेत.

दत्तवाडी पोलीस चोरट्याचा शोध असताना तो विघ्नहर्ता बिल्डिंगचे पार्किंगमध्ये सर्वे नंबर १३२ सिंहगड रस्ता पुणे येथे थांबला आहे, अशी माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कुलदीप संकपाळ, कर्मचारी पोलीस हवालदार रवींद्र फुलपगारे, राजू जाधव, पोलीस नाईक सुधीर घोटकुले, महेश गाढवे, कुणाल माने, सोमेश्वर यादव, बजरंग पवार आदींच्या पथकाने ही कामगिरी केली. घटनास्थळी धाव घेत स्वप्निल आवळे याला ताब्यात घेतले. दरम्यान, त्याने पर्वती टेकडीवर एका युवकास मारहाण करीत मोबाइल हिसकावून घेतला. तसेच, वॉचमन आल्याने तेथून पळून गेलो असल्याचे सांगितले. त्याच्याकडून मोबाइल जप्त करण्यात आला आहे. न्यायालयाने त्यास १७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**Pune Mirror - 13 January, 2019**

# Murder accused poses as RAW officer, caught

**Bihar man was seen loitering outside Kondhwa PS; when probed, he said he had info on alleged arms dealing, however, confessed to be on the run after the crime**

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

A murder accused from Bihar who was on the run after killing a businessman there has been arrested by Kondhwa police. The culprit, who has been holed up in Pune for the past two months, landed up in Kondhwa police station to give them a 'tip-off' about 'huge number of weapons entering Pune from Bihar', posing as an officer of an additional superintendent of police rank, working with the Research and Analysis Wing (RAW), informed the cops. However, Kondhwa police had doubts on the accused's demeanour, his body language and the way he presented himself. When officers took him for interrogation and probed him, the imposter confessed that he was not attached with RAW but an absconding culprit charged of murder.

According to the cops, the accused has been identified as Sonu Suraj Tiwari (26), resident of Bihar, now arrested by Kondhwa police. Police constable Amol Phadtare had registered a complaint against the accused in this matter. A case has been registered under sections 419 (cheating by personation) and 420 (cheating and dishonestly inducing delivery of property) of the Indian Penal Code against the accused in Kondhwa police station.

The culprit was allegedly loitering on the premises of Kondhwa police station when constable Phadtare noticed him and questioned him about his whereabouts. To this, Tiwari replied that he was there to meet a senior official and give him an important information of arms being smuggled into the city. He said that on January 15, a person was to come to Pune by Danapur Express, bringing along with him illegal weapons into the city. When cops probed him further, he said that he was associated with RAW. Still not convinced, cops took him into a room for further interrogation. That is when he changed his stance and said that although he wasn't a cop, he was looking to be a police informer and was trying to get in touch with senior officials to give them a tip-off of a possible arms dealing, the cops said.

When questioned further, Tiwari admitted of being a murder accused in Bihar, who has been on the run since he was involved in the killing of a well-known businessman there. Elaborating on the case, police sub-inspector VV Wadkar told *Mirror*, "When we scanned his mobile phone, we got his photos. In one of the pictures, the culprit is shockingly dressed in police uniform. We also found several saved images of news articles of the reported murder published in various local newspapers. Instead of being remorseful, he was rather gratified when we read out those reports. We have arrested the accused and handed him over to Bihar police on Sunday."




Cops found Tiwari's photos on his mobile, where he was dressed in police uniform

> **"We have arrested the accused and handed him over to Bihar police on Sunday**
> —VV Wadkar, sub-inspector, Kondhwa PS

---

**पुढारी – दि. १ जानेवारी, २०२०**

गुन्हेवृत्त



मोबाईल जप्त केल्यानंतर विश्रामबाग पोलिस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी आणि सराईत चोरटा.

# मोबाईल चोरी करणारा सराईत जेरबंद

**पुणे :** कोल्हापूर येथील मोबाईल चोरी करणाऱ्या सद्गुरु गोवर्धन निगवेकर. (रा. धोतरे गल्ली, कोल्हापूर) या सराईताला मोबाईल विक्रीसाठी आल्यानंतर विश्रामबाग पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याविरोधात पुणे शहर आणि कोल्हापूर येथे मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल आहेत. पोलिस शिपाई शिरोळकर व पोलिस शिपाई शिंदे यांना निगवेकर हा चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार कारवाई केली. परिमंडळ १ च्या पोलिस उपायुक्त श्रीमती स्वप्ना गोरे, सहायक पोलिस आयुक्त सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दादासाहेब चुडाप्पा, पोलिस निरीक्षक गुन्हे राम राजमाने, पोलिस उपनिरीक्षक विजय जाधव, समाधान कदम, पोलिस हवालदार शरद वाकसे, पोलिस नाईक धीरज पवार, विठ्ठल खिलारे, बाबा दांगडे, पोलिस शिपाई राहुल पवार, चेतन शिरोळकर, विनोद ओंबासे, प्रशांत शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# गोव्याला पळून जाण्याआधीच आरोपींच्या मुसक्या आवळल्या

## भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई


गाडीची घासाघीस...आणि रचला ठार मारण्याचा कट

भारती विद्यापीठ पोलिसांकडून तिघांना अटक

पुणे, दि. २५ - रस्त्याने जाताना गाडीची किरकोळ घासाघीस झाल्याने एका तरुणाच्या खुनाचा कट रचण्यात आला. त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी करण्यात आले होते. दरम्यान, आरोपी गुन्हा केल्यानंतर नवले ब्रीजच्या खालून गाडी पकडून गोवा येथे जाणार असल्याची खबर पोलीस कर्मचारी राहुल तांबे आणि सचिन पवार यांना मिळाली, त्यांनी खातरजमा केल्यानंतर इतर सहकाऱ्यांच्या मदतीने तीघाही आरोपींना अटक केली. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच गुन्हा कबूल केला. यातील आरोपी सुनील राठोड याच्यावर उत्तमनगर, वारजे माळवाडी, पौड येथे मारहाण, चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, असे तब्बल ११ गुन्हे दाखल आहेत. त्याला उत्तमनगर पोलिसांनी तडीपार केले आहे. तर प्रतिक नलावडे याच्याविरुध्द उत्तमनगर पोलीस ठाण्यात जबरी चोरी व मारामारीचे गुन्हे दाखल आहेत.

सुरेश ऊर्फ आप्पा प्रकाश मुस्तारी (२४, रा. टिळेकरनगर, कोंढवा), सुनील ऊर्फ राठ्या गोपाळ राठोड (२३, रा. उत्तमनगर), प्रतीक ऊर्फ पद्या संजय नलावडे (२२, रा. येरवडा) अशी अटक आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी अमित रामदास निंबाळकर (२५, रा. हवेली) याने फिर्याद दिली होती.

यासंदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी अमित निंबाळकर व आरोपी सागर माने याची दोन महिन्यांपूर्वी दुचाकी एकमेकाला घासल्याने भांडणे झाली होती. याचा राग मनात धरून सागर मानेने सुरेश मुस्तारी, सुनील राठोड आणि प्रतिक नलावडे यांना फिर्यादीवर लक्ष ठेऊन जीवे ठार मारण्यास सांगितले होत. त्यानुसार अपघाताचा बनाव करत इतरही साथीदार त्या ठिकाणी आले.

यानंतर आरोपीने फिर्यादीवर कोयता आणि लाकडी दांडक्याने डोक्यात व हातावर सपासप वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करून पळ काढला होता. ही कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त संजय शिंदे, पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त सर्जेराव बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत कुंवर, पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक भूषण कोते, पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, कुंदन शिंदे, सर्फराज देशमुख, राहुल तांबे, सचिन पवार, गणेश चिंचकर, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, अभिजीत जाधव यांच्या पथकाने केली.

**पुढारी** – दि. २३ जानेवारी, २०२०

# मोक्कातील फरार सराईत जेरबंद

## शहर ग्रामीण परिसरात ८ गंभीर गुन्हे दाखल

**पुणे: पुढारी वृत्तसेवा**

पाच वर्षापासून मोक्कामध्ये फरार असलेल्या करण मुरलीधर चोरघे (वय.३०, रा. शिवपार्वती विहार भारती विद्यापीठ) या सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने जेरबंद केले. यावेळी त्याच्या ताब्यातून ७० हजार रुपये किंमतीची मोपेड दुचाकी जप्त करण्यात आली आहे. पुढील कारवाईसाठी त्याला वेल्हे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

चोरघे हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर पुणे शहर व ग्रामीण परिसरात खून, खुनाचा प्रयत्न, दोरडा, बेकायदा पिस्तूल बाळगणे अशा प्रकारचे आठ गंभीर गुन्हे दाखल आहेत. मागील पाच वर्षापासून तो विविध गुन्ह्यांत फरार होता. गुन्हे शाखेच्या पथकाला चोरघे हा भारती विद्यापीठ येथील सार्वजनिक रोडवर उभा असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून त्याला अटक करण्यात आली. ही कारवाई अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, निरीक्षक अरुण वायकर, उपनिरीक्षक हनुमंत शिंदे कर्मचारी गजानन सोनुने, प्रकाश लोखंडे, अशोक माने यांच्या पथकाने केली.

**पुढारी** – दि. २२ जानेवारी, २०२०

# गावठी कट्ट्याची तस्करी करणारा जेरबंद

- रेल्वेस्टेशन परिसरातून ताब्यात
- दोन गावठी कट्टे जप्त

**पुणे: पुढारी वृत्तसेवा**

रेल्वेमार्गे गावठी कट्ट्याची तस्करी करणाऱ्याला गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने जेरबंद केले. यावेळी त्याच्या ताब्यातून चाळीस हजार रुपये किंमतीचे दोन गावठी कट्टे जप्त करण्यात आले आहेत.

धीरजकुमार विनोद सिंह (२१ रा.जयश्री पो. काराकाट जि. रोहतास, बिहार) असे अटक केलेल्याचे नाव आहे. गावठी कट्ट्यांची तस्करी करणाऱ्यांची माहिती काढत असताना मंगळवारी पहाटे चारच्या सुमारास दानापूर पुणे या रेल्वेने एक व्यक्ती गावठी कट्टे घेऊन येणार आहे, अशी माहिती कर्मचारी शिंदे व कंधारे यांना मिळाली होती. त्यानुसार उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडीक कर्मचारी मंगेश पवार, मगर यांच्या पथकाने रेल्वे स्टेशनच्या आऊट गेटवर फुटपाथवर संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी करून झडती घेतली असता त्याच्याकडील बॅगमध्ये दोन देशी बनावटीचे कट्टे मिळून आले. बेकायदा हत्यार बाळगल्याप्रकरणी सिंह याच्यावर बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी अप्पर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.



**Pune Mirror - 13 January, 2019**

# Man sexually abuses sisters, both minors, on two occasions, arrested

**Eyewitness alerts locals, who hand over culprit to cops**

Gunwanti.Paraste
@timesgroup.com

TWEETS @gunwantimirror

In yet another shocking sexual crime against children, two sisters, aged three and five, respectively, were allegedly molested twice by a housekeeping person in Camp, once on January 7 and again on January 11. The 35-year-old accused, who would frequent the area, apparently took the sisters, also residents of Camp, to an auto stationed nearby on the pretext of buying them chocolates. The incident came to light on Saturday when a 20-year-old woman present near the scene of the crime saw the two minors with tattered clothes in an auto, with the culprit allegedly molesting the duo, suspected something was wrong and alerted locals. Citizens immediately gathered around the autorickshaw and questioned the man. The girls were rescued and the agitated locals beat up the accused and eventually handed him over to the cops. A case has been registered in Lashkar police station in this regard.

According to the complaint filed by the mother of the two minors, the 20-year-old eyewitness saw the suspect touching the sisters inappropriately while they were almost stripped naked. When police interrogate the accused, he allegedly confesses to have committed the crime on two different occasions. Both times, the offender chose the same spot and time, around 4 pm, to give fruition to his heinous act, said police officials.


REPRESENTATIVE IMAGE

The incident took place in Camp

Talking about the case, sub-inspector Jyoti Panhale, investigating officer in the case, told *Mirror*, "A case has been registered against the accused under sections 354 (a) (punishment for sexual harassment) and 506 (punishment for criminal intimidation) of the Indian Penal Code and sections 7, 8, 11 and 12 of the Protection of Children from Sexual Offences (POCSO) Act, 2012. The culprit has been identified as Ravi alias Moses Dadarao Narmal. A housekeeping staff by profession, he would go to Camp for cleaning work. He would observe the sisters playing in the area every day and decided to take advantage of the fact that no one was watching over the kids to perpetrate his crime. He even threatened the victims of dire consequences of they opened their mouths. Thankfully, the eyewitness had the presence of mind and alerted locals about the incident."

**Pune Mirror - 7 January, 2019**

# Pune cops close to solving bizman's murder mystery

**Crime branch detains 1; sleuths say chit kept in Shevani's pocket was to misguide investigators**

Gunwanti.Paraste
@timesgroup.com

TWEET @gunwantimirror

A day after city-based businessman's body was found near a canal in Padegaon in Khandala, Pune crime branch has detained one person. They have so far found that four people were involved in the crime.

Chandan Kripadas Shevani, 48-year-old owner of a popular shoe showroom on Laxmi Road, went missing from Maldhakka Chowk on Saturday night around 10.30. His car was found in the area.

A resident of Parmar Paradise, Sadhu Vaswani Chowk, Shevani had called his family at 10.20 pm to tell them that he had shut his shop and that he was returning home. When he did not reach home even after the set time, his family members tried to call him, but his phone was allegedly switched off. They immediately approached the cops and registered a missing person case in Bund Garden police station. Even cops tried to reach out to him but found his mobile phone to be switched off.


Shevani went missing on Jan 4

A day later, on Sunday afternoon, his body was found in Padegaon. Initially, Lonand police station filed a murder case even while the identity of the body was yet to be established. Much later, cops were able to establish that the body of the missing businessman from Pune.

Cops recovered a note from his pocket, stating that he had been killed for not shelling out Rs 2 crore extortion. After being abducted, Shevani was shot in the head and his body dumped in the canal.

**FLASHBACK**


City-based businessman m
for failing to pay extortion

Mirror reported about the murder on Jan 5, 2020

By late Sunday night, the case was transferred to Pune and several police teams started working on the murder mystery. "We are very close to cracking the case. We have detained a person, who does not seem to be directly involved in the crime. But he has shed light on involvement of four people. The accused are not attached to any gang. The chit found in the deceased's pocket was only to misguide the investigators. We will very soon have the accused in our custody," said Shivaji Pawar, assistant commissioner of police attached to Pune crime branch.

लोकमत – दि. १८ जानेवारी, २०२०

# गोणीतील मृतदेहाची पटली ओळख

## खुनाचा गुन्हा उघड : चोवीस तासांत आरोपी ताब्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**धनकवडी :** पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील जांभूळवाडी बोगदा परिसरात बुधवारी सकाळी गोणीत बांधून टाकलेल्या मृतदेहाची ओळख पटली असून केवळ चोवीस तासांत खूनाचा गुन्हा उघडकीस आणण्यात भारती विद्यापीठ पोलिसांना यश आले आहे.

जांबूळवाडी बोगदा परिसरात साईराजसृष्टी प्रकल्पाकडे जाणाऱ्या टेकडीच्या रस्त्याकडेला महिलेचा मृतदेह टाकण्यात आला होता. बुधवारी सकाळी साडेअकरा वाजता रहिवाशांनी पोलिसांना माहिती दिली होती. भारती विद्यापीठ पोलिसांच्या तपासात महिलेची ओळख पटताच चोवीस तासांत ते गुन्हेगारांपर्यंत पोहचले. सुनीता बापू शेळके (वय ४०, रा. गोसावी वस्ती, कर्वे रोड) असे खून झालेल्या महिलेचे नाव असून प्रेमसंबंध व पैशाच्या वादातून दीपक रावसाहेब सुकळे (वय २५) याने खून केल्याचे उघड झाले आहे.



महिलेची ओळख पटताच २४ तासांत आरोपींना जेरबंद करणारे भारती विद्यापीठ पोलीसांचे पथक पकडेल्या आरोपींसह.

तपासात गुन्हेगारांपर्यंत पोहचलेले पोलीस उपनिरीक्षक महेंद्र पाटील आणि तपास पथकातील पोलीस कर्मचारी प्रणय संकपाळ व हर्षल शिंदे यांनी केलेल्या चौकशीत दीपक सुकळे याने या खुनाची कबुली दिली. कापूरहोळ येथील खासगी कंपनीशेजारी असलेल्या दीपकला अटक करण्यात पोलिसांना यश आले. दीपक आणि सुनीताचे प्रेमसंबंध होते. दीपकला दिलेले पैसे सुनीता वारंवार मागत होती.

मंगळवारी संध्याकाळी कापूरहोळला जाऊन सुनीताने पैशासाठी तगादा लावला. आरडाओरडा केल्याने चिडून जाऊन दीपकने तोंड दाबून मारहाण केल्याने सुनीताचा मृत्यू झाला. दीपकचा अल्पवयीन पुतण्या आणि त्याचा धायरी येथील मित्र धर्मेंद्र जांबवंत यांच्या साहाय्याने मृतदेह गोणीत बांधून जांभूळवाडी बोगदा परिसरात टाकला. दीपकसह जांबवंत यालाही पोलिसांनी अटक केली आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक आशिष कवठेकर हे करीत आहेत.

---

महाराष्ट्र टाइम्स – दि. १० जानेवारी, २०२०

# एक कोटींची फसवणूक करणारे तिघे गजांआड

**पुणे :** स्टील खरेदी करण्याच्या बहाण्याने एक कोटी १३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी कर्नाटक येथील आंतरराज्य टोळीतील आणखी तिघांना सायबर पोलिसांनी अटक केली. त्यांना १४ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.



सादिक शरीफ अमझद शरीफ, सफीर अहमद नजीर अहमद (दोघेही रा. म्हैसूर), महमंद अलिम खान (रा. बेंगळुरू) यांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी संतोष शिवाप्पा चन्नाबसप्पा (३१) आणि संदेश सत्यनारायण सिंधे (३४, दोघेही रा. कर्नाटक) यांना यापूर्वी अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी, गौरव बन्सीधर गुप्ता (३७, रा. न्याती इन्क्लेव्ह सोसायटी, महंमदवाडी) यांनी सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार १० जून ते १८ नोव्हेंबर २०१९ दरम्यान घडला.

गुप्ता यांचा स्टील विक्रीचा व्यवसाय आहे. संशयित आरोपींनी वेगवेगळ्या क्रमांकावरून संपर्क साधून एक कोटी ५० लाख ९८ हजारांचे ३०८ टन स्टील खरेदी केले. त्यातील व्यवहारापोटी ३७ लाख ७४ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने गुप्ता यांना पाठविण्यात आले. उर्वरित राहिलेले एक कोटी १३ लाख २३ हजार रुपये न देताच फसवणूक केली. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या तिघांना कोर्टात हजर करण्यात आले. अटक केलेल्या आरोपीची आंतरराज्य टोळी असून, या टोळीकडून स्टील खरेदीच्या बहाण्याने व्यापाऱ्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली जात आहे. खरेदी करण्यात आलेले स्टील कोठे विकले जाते, याचा तपास करायचा असून, त्यासाठी त्यांना पोलिस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी सरकारी वकील ज्ञानेश्वर मोरे यांनी केली.

PuneMirror - 5 January, 2019

# 28-yr-old arrested for stealing cop's revolver

**Aurangabad-based API was at Koregaon Bhima when the gun was stolen off him; accused was found wandering in city**

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEET @gunwantimirror

On January 1, an Aurangabad-based assistant police inspector (API) lost his revolver while he was stationed at Koregaon Bhima, where people gather in large numbers every year as a tribute to Dalit warrior. While on duty, the cop lost his consciousness, following which an unknown person stole the revolver, 10 rounds and a mobile phone.

Three days later, the Bund Garden police received a tip-off, stating that an unknown person was roaming about with illegal arms. They successfully trapped the accused within hours on Saturday, following which he confessed to the crime. A case was registered in Lonikand police station.

API Sahebrao Namdev Kamble, 53, had lodged the complaint in this matter. He had said that he was on bandobast duty when the incident took place.

The cop, who is attached to Aurangabad control room, reached Koregaon Bhima at 10 am on December 28, 2019. He was to report to Lonikand police station about the happenings.

Kamble was put up at Yashwardhan Lodge near Tulapur Naka. After completing his duty over three days, at 11 pm on January 1, he returned to the hotel to freshen up. Subsequently, he visited Hotel Sharvani for dinner and had carried his revolver with him.



Mukesh Bhandari (inset) confessed to stealing the gun and 10 rounds from the cop, when he had fainted after the bandobast duty

> **We received a tip-off recently, claiming that a man was wandering in our jurisdiction and was in the possession of an illegal weapon**
>
> — Sandpi Jamdade, API with Bund Garden police

At a particular instance on his way back to the lodge, he had felt dizzy and taken a fall. A few locals had helped him in the situation and even managed to get him to the hotel, where he realised that his revolver was missing. Kamble even searched the area exhaustively, but to no avail. When he wanted to report the matter to his senior, he realised that his phone was stolen, too. Kamble then approached the Lonikand police station and lodged a complaint.

API Sandip Jamdade of Bund Garden police station told Mirror that they received a tip-off recently, claiming that a man was wandering in their jurisdiction and was in the possession of an illegal weapon. The cops immediately sprang into action.

The accused, Mukesh alias Max Shivaji Bhandari (28), was sitting near a closed shop on Tadiwala Road when the cops spotted him. As soon as they began closing up on him from both the sides, he ran away as one of the officers was still sporting a uniform. After a two-minute pursuit, they apprehended him. He was found in the possession of revolvers and 10 rounds. During interrogation, he revealed that he had stolen the revolver from a cop.

Bhandari has been booked under Indian Penal Code section 379 (theft).

---

महाराष्ट्र टाइम्स – दि. ३१ जानेवारी, २०२०

# साडेनऊ लाखांची चोरी करणाऱ्यास अटक

**कोथरूड परिसरात महिला डॉक्टरच्या घरी चोरी**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कोथरूड परिसरात राहणाऱ्या महिला डॉक्टरच्या घरी चोरी करून, रोख रक्कम आणि सोन्याची बिस्किटे असा सव्वा नऊ लाख रुपयांचा ऐवज चोरणाऱ्या चोरट्याला अलंकार पोलिसांनी बेड्या ठोकल्या. या डॉक्टर आणि त्यांच्या कुटुंबीयांचा विश्वास संपादन ही चोरी करण्यात आल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात समोर आले आहे.

बापू रोहिदास कांबळे (वय ४७, रा.शास्त्रीनगर, कोथरुड) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. कोथरूड येथील सिटी प्राइड चित्रपटगृहाजवळ राहणाऱ्या एका महिला डॉक्टरच्या घरातील ३०० ग्रॅम सोने व पावणे दोन लाख रुपयांची रक्कम असा ऐवज चोरीला गेला होता. याची तक्रार अलंकार पोलिस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आली होती. पोलिसांकडून याचा तपास सुरु होता. या चोरीच्या प्रकरणातील आरोपी यश हॉस्पिटल परिसरामध्ये येणार असल्याची माहिती तपास पथकातील पोलिस नाईक राजेंद्र लांडगे, किरण राऊत व योगेश वडगे यांना मिळाली होती. पोलिस उपनिरीक्षक सुरज गोरे, पोलिस कर्मचारी लांडगे, राऊत, वडगे, प्रफुल्ल चव्हाण, संदीप धनवटे यांच्या पथकाने या ठिकाणी सापळा लावून या आरोपीला ताब्यात घेतला.

आरोपी कांबळे हा डॉक्टरांकडे सहा ते सात वर्षांपासून चालक म्हणून काम करत होता. त्यामुळे त्याच्यावर सर्व कुटुंबाचा विश्वास होता. घरात वावरत असताना त्याने फिर्यादी यांच्या घरातील साडे सात लाख रुपये किंमतीची ३०० ग्रॅम वजनाची तीन सोन्याची बिस्कीटे व पावणे दोन लाख रुपयांची असा सुमारे सव्वा नऊ लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेला होता. नोकरांकडे चौकशी सुरु असताना कांबळे याने ही चोरी केल्याचे पोलिसांना कळले. त्यानुसार पोलिसांनी त्याला अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ५ जानेवारी, २०२०

# गोंदणावरून काढला सराईताचा माग

## प्रवासी बनून कॅबचालकाला लुटणाऱ्याला सिंहगड रोड पोलिसांनी केली शिताफीने अटक

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT

**पुणे** : गुन्हा घडल्यानंतर आरोपीला पकडण्यासाठी पोलिस काही सुगावा मिळतो का हे पाहत असतात. एखादा सुगावा मिळाल्यानंतर त्यावरून कड्या जोडत आरोपीला बेड्या ठोकल्या जातात. अशाच प्रकारे सिंहगड रोड पोलिसांनी हातावरील गोंदणावरून आरोपीला अटक केली आहे.

सिंहगड रस्त्यावर मध्यरात्री एका कॅबचालकाच्या कारमध्ये प्रवासी म्हणून बसल्यानंतर चालकालाच चाकूच्या धाकाने लुटण्यात आले होते. त्या वेळी चालकाला एका आरोपीच्या हातावर गोंदलेले चिन्ह दिसले होते. त्याने पोलिसांना त्या गोंदणाची माहिती दिली आणि पोलिसांनी यापूर्वीच्या आरोपींचे रेकॉर्ड काढून हातावर गोंदण असलेल्यांची माहिती घेतली. त्या वेळी एका सराईताच्या हातावर असलेले गोंदण आणि कॅबचालकाने सांगितलेल्या वर्णनाचे गोंदण एकसारखेच असल्याचे समोर आले. यावरून पोलिसांनी तपास केला असता त्यानेच हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्यात तक्रारदार यांच्या चाणाक्ष नजरेमुळे आणि पोलिसांचा गुन्हेगारांचा असलेल्या अभ्यासामुळे जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीला दोन दिवसांत अटक करण्यात आली.

मोशी येथे राहणारा रमेश जाधव (वय २०) हा शहरात कॅब चालविण्याचे काम करतो. २१ मार्च २०१९ रोजी मध्यरात्री रमेश हा त्याची कॅब सिंहगड रस्त्यावरून घेऊन जात होता. राजाराम पुलाजवळ दोन व्यक्ती त्याच्या कॅबमध्ये बसल्या. भाडे ठरल्यानंतर त्यांनी धायरी परिसरातील धायरेश्वर मंदिराजवळ सोडण्यास सांगितले. रमेश याने त्यांना धायरीत सोडल्यानंतर भाड्याचे पैसे मागितले. पण, त्या दोघांनी भाडे देण्यास नकार देऊन दमदाटी सुरू केली. भाड्याच्या पैशावरून रमेशने वाद सुरू केला. त्या वेळी आरोपींनी चाकू काढून रमेशला धमकाविले. त्याच्याकडून रोकड, मोबाइल जबरदस्तीने हिसकावून घेतला आणि कॅबमधून उतरून पळून गेले. रात्र असल्यामुळे रमेशला काहीही करता आले नाही. या प्रकरणी रमेश याने सिंहगड रोड पोलिस ठाणे गाठले आणि घटनेची सविस्तर माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी रमेश याच्याकडून घटनेची आणि आरोपींबाबत सर्व माहिती घेतली. तसेच, आरोपींचे वर्णनदेखील विचारले. रमेशला एका आरोपीने चाकूचा धाक दाखविला होता. त्या वेळी आरोपीच्या हातावर असलेले गोंदण त्याने पाहिले होते. यावरून सिंहगड रोड पोलिसांनी रेकॉर्डवर असलेल्या आरोपींची माहिती काढण्यास सुरुवात केली. त्यामध्ये जबरी चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपींची माहिती काढली. त्या वेळी एका सराईत आरोपीच्या हातावरदेखील रमेशने सांगितलेल्या वर्णनाचे गोंदण असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. पोलिसांनी संशयित कृष्णा भगवान गोरेकर (वय २०, रा. गोविंदनगर, नांदेड फाटा, सिंहगड रस्ता) याचा शोध सुरू केला. सिंहगड रोड पोलिस ठाण्याच्या तपास पथकाला गोरेकर याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला पकडण्यात आले. त्याच्याकडे कॅबचालकास लुटलेल्या घटनेबाबत विचारल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. साथीदाराच्या मदतीने त्यानेच हा गुन्हा केल्याचे पोलिसांना सांगितले. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला अटक केली.

### गुन्हेगारांचे पोलिसांकडील रेकॉर्ड आले कामी

एखाद्या आरोपीला पकडल्यानंतर पोलिस त्याचा फोटो, चेहरपट्टी, हाताचे ठसे, अंगावरील महत्त्वाची खूण, पूर्ण पत्ता, मोबाइल क्रमांक, काम काय करतो, नातेवाईक अशी सर्व माहिती घेतात. त्यामुळे एखादा गुन्हा घडल्यास त्या रेकॉर्डचा बऱ्याचदा पोलिसांना फायदा होतो. या रेकॉर्डवरून अनेक गुन्ह्यांतील आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यातदेखील गुन्हेगाराचे रेकॉर्ड आरोपीचा माग काढण्यात कामी आले.





पुण्य नगरी – दि. १६ जानेवारी, २०२०

# ग्राहकांच्या एटीएमची माहिती चोरून रक्कम काढणारी टोळी जेरबंद

## सायबर पोलिसांची कारवाई : परप्रांतीय चौघांकडून सहा गुन्हे उघड

। पुणे । प्रतिनिधी

पेट्रोल पंपावर काम करीत असताना ग्राहकांच्या डेबिट आणि क्रेडिट कार्डची माहिती चोरून त्यांच्या बँक खात्यातील रक्कम काढून घेणाऱ्या टोळीला सायबर पोलिसांनी अटक केली. त्यांनी केलेले सहा गुन्हे उघडकीस आणण्यात पथकास यश आले आहे. मिथुन जमशेद अली, नोवन सादिक शेख, सईमुद्दीन अताउर रहमान (तिघे रा. गणेशनगर, वडगाव शेरी, मूळ जि. मालदा, पश्चिम बंगाल) आणि जुल्फीकार अहमद दुलाल हुसेन (मूळ पश्चिम बंगाल) असे अटक केलेल्या आरोपींचे नावे आहेत.

शहरातील नागरिकांनी त्यांच्या एटीएम कार्डचा वापर केलेला नसतानाही त्यांच्या बँक खात्यातून रक्कम काढून घेण्याचे प्रकार वाढले होते. प्राप्त तक्रारींनुसार सायबर पोलीस ठाण्याचे पथकाने विश्लेषण केले असता अनेक तक्रारदारांनी कँम्प परिसरातील एकाच पेट्रोल पंपावरून पेट्रोल भरल्याचे निदर्शनास आले. तेथे जाऊन चौकशी केली असता तेथे काम करणारे मिथुन, नोवन शेख आणि सईमुद्दीन आली हे तिघेही मूळचे पश्चिम बंगाल राज्यातील एकाच गावातील आहेत. तसेच, मागील तीन महिन्यांपासून एकाच रूममध्ये राहावयास असल्याचे समजले. त्यांच्यावर संशय आल्याने पथकाने त्यांच्याकडे चौकशी केली.

नागरिकांनी पेट्रोल भरल्यानंतर कार्डद्वारे पेमेंट करीत असताना तिथे कामगार कार्डचा डेटा, तसेच पीन क्रमांक पेमेंट स्लिपवर लिहून घेत असत.

तसेच या कार्डची माहिती आणि पीन क्रमांक त्यांचा चौथा साथीदार जुल्फीकार अहमद यास देत असल्याचे उघडकीस आले. त्यामुळे पोलिसांनी चौघांना अटक केली. तसेच त्यांच्याकडून ७ मोबाइल, वीस बनावट डेबिट कार्ड, १२ विविध बँकांचे कार्ड, ओळखपत्र आणि आधार कार्ड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. न्यायालयाने त्यांना २४ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यांनी याप्रकारे अनेकांची फसवणूक केली असल्याचा संशय तपासाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, सहायक निरीक्षक गंगाधर घावटे, कर्मचारी अस्लम आतार, मंगेश नागरे, अनिल पुंडलिक, सौरभ घाटे, आदेश चलवादी, बाबासाहेब कराळे, आनंद भंडलकर आदींच्या पथकाने ही कामगिरी केली.



### कार्डचा क्रमांक नियमित बदलावा

नागरिकांनी कोठेही क्रेडिट, डेबिट कार्डद्वारे पेमेंट करीत असताना आपण टाकत असलेला पीन क्रमांक कोणी पाहत नाही ना याची खात्री करावी. तसेच, सुरक्षिततेसाठी दर दोन महिन्यांनी एटीएम कार्डचे पीन क्रमांक बदलावेत.

### ...अशी चोरायचे कार्डची माहिती

जुल्फिकार अहमद हा पूर्वी पुण्यातील पेट्रोल पंपावर काम करीत होता. त्यांनी इतर तिघांना पंपावर काम मिळवून देतो, असे सांगून तीन महिन्यांपूर्वी पुणे शहरात आला आणि त्याने त्यांना कँम्प परिसरातील पंपावर कामास लावले. आरोपींनी रिक्रूटरच्या माध्यमातून पेट्रोल पंपावर आलेल्या ग्राहकांकडील कार्ड स्वाइप करून पीन क्रमांक टाकत असताना ते चोरून पाहून त्यावर पीन क्रमांक लिहून ठेवत असत आणि चोरलेली माहिती दिल्लीतील आरोपींना देत. तेथून ऑनलाइन व्यवहार करून रक्कम काढून घेतली जात असे.

TIMES OF INDIA - 5 January, 2020

# Autorickshaw driver in cop net for robbery, culpable homicide

Aseem Shaikh
@timesgroup.com

**Pune:** An advertisement sticker pasted on the hood of an autorickshaw helped the Koregaon Park police detect the case of missing realtor Rajesh Leeladhar Mhatre (46) from Navi Mumbai. Mhatre's body was recovered from the Mula-Mutha river bed on November 28.

The police on Friday night arrested the autorickshaw driver, Shabaf Jahangir Bangi (28), from Gadital at Yerawada and booked his two friends for culpable homicide and robbing Mhatre of Rs4 lakh. A magisterial court on Saturday remanded Bangi in police custody till December 8.

Mhatre had withdrawn cash from his bank account on November 26. He boarded a state transport bus and alighted at the Swargate bus terminus around 7.15pm. He then hired Bangi's autorickshaw to reach Mandai on account of a business meeting.

According to the police, Bangi got the whiff that Mhatre was allegedly under the influence of alcohol and he was in possession of a large amount of cash. Instead of dropping Mhatre at his destination, the rickshaw driver drove him to Kumbhar Ves chowk. At the junction, Bangi called his friends and asked them to meet him on Burning Ghat Road.

The trio then allegedly offered Mhatre liquor, and after he passed out, they robbed the cash and dumped him behind the bushes on the river bed, the police said.

Senior inspector Pramod Patki of the Koregaon Park police said, "We recovered the body of an unidentified man after receiving a telephone call from the city police control room. We established Mhatre's identity on the basis of the Aadhaar card found on him. The Sassoon hospital has preserved the victim's viscera for seeking expert opinion and reserved the cause of his death after post-mortem."

Patki said, "While checking footage of CCTV cameras, a police team received the vehicle registration number of the autorickshaw but the number plate was only partially visible. We then received a clue that the vehicle hood had a private firm's advertisement sticker. We checked CCTV footage from other locations and established the route taken by the rickshaw driver. Bangi had changed the hood but he was taken into custody after investigations established that he had abandoned Mhatre at a secluded spot on the river bed."

Bangi's questioning revealed the involvement of his friends. A manhunt has been launched to arrest them.

A police officer said, "Mhatre's family registered a missing person's complaint with the NRI police station at Navi Mumbai on November 27. We are recording statements of his family members and others."

An offence under sections 304 (culpable homicide not amounting to murder), 392 (robbery) and 34 (common intention) of the Indian Penal Code was registered against Bangi and others.

## MISSING REALTOR MYSTERY

**On November 26, realtor Rajesh Leeladhar Mhatre had travelled from Navi Mumbai to Swargate in a state transport bus. He was carrying cash worth Rs4lakh and was allegedly under the influence of alcohol**

- Mhatre hailed Shabaf Jahangir Bangi's rickshaw to go to Mandai. But on noticing that he was inebriated, Bangi took Mhatre to Burning Ghat Road, where he met two other friends
- **Together, the men ensured Bangi consumed more alcohol and when he passed out, they robbed him. The three accused dumped him behind the bushes on the river bed**

"While checking CCTV cameras, a police team received the autorickshaw's registration number but it was only partially visible. We received a clue that the vehicle hood had an advertisement sticker. We checked CCTV footage and established the route. Bangi had changed the hood but he was taken into custody after investigations established that he had abandoned Mhatre at a secluded spot

—**Pramod Patki** | SR INSPECTOR, KOREGAON PARK POLICE STATION

Pune Mirror - 3 January, 2019

# MBA graduate arrested for robbing forex agents

## 31-yr-old committed similar crimes in Hyderabad, claims debt prompted him to

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror


An interesting case of 'white collar crime' was busted by the Pune police's crime branch (unit II) at the start of the new year, after they managed to corner a young MBA graduate who was going around robbing foreign exchange (forex) agents.

On January 1 this year, city police got accused Rahul Kiran Gatiya (31), a resident of Mumbai, here from Hyderabad, where he had been arrested for the same crime on December 30, 2019.

His modus operandi allegedly involved soliciting US dollars from unsuspecting forex company agents, then robbing then by spraying some unknown substance into their eyes to incapacitate them.

In November last year, various forex company employees in the Koregaon Park and Yerwada areas of Pune got calls from Rahul, demanding USD in exchange for rupees. Thereafter, at least two such agents were robbed of the currency they were carrying. The case was subsequently being investigated by senior inspector Mahendra Jagtap of crime branch (unit II) and his team.

Meanwhile, two similar crimes had taken place in Hyderabad, where an arrest had also been made. Hearing this, a squad of the investigating team from here travelled to the South Indian metro, and found that the same young man had been perpetrating this inter-city drama. In fact, when he was questioned about the same, he confessed to the crime. Accordingly, he was taken into custody and brought to Pune.



Accused Rahul Gatiya

Deputy commissioner of police (DCP) Bachchan Singh informed *Mirror*, "The accused committed the crime with much deliberation. He came to the city and booked a service apartment under a fake name, then began calling forex agents around town and asking for US dollars. When he met them, he used a mask to cover his face to prevent being caught on camera. Since he lives in Mumbai, he is alleged to have committed crimes here, as it is a nearby city."

> **"The accused came to the city and booked a service apartment under a fake name, then began calling forex agents around town and asking for US dollars. He used a mask to cover his face to prevent being caught on camera**
>
> –DCP Bachchan Singh

The accused, who has studied a Master of Business Administration in finance, used to previously run a business selling electronic goods to online companies. However, he told police that he faced losses in this venture as he had taken heavy loans to set it up. In January last year, his marriage dates were decided, so he was trying to repay his loan and arrange money for the wedding, he claimed.

The next cities on his target list, said cops, were Surat and Baroda, adding that although Rahul hails from a well-educated family, crippling debt threw him into the world of crime.

# प्रवाशाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या रिक्षाचालकाला अखेर अटक

पुणे, दि. ४ (प्रतिनिधी) – दारू प्यायलेल्या प्रवाशाला लुटून त्याला निर्जनस्थळी सोडून दिले. थंडीमुळे झालेल्या प्रवाशाच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या रिक्षाचालकास कोरेगाव पार्क पोलिसांनी जेरबंद केले. ही घटना २६ ते २८ नोव्हेंबर या कालावधीत रात्री नऊच्या सुमारास कोरेगाव पार्क परिसरात घडली.

शादाफ जहांगिर बांगी (वय २८, रा. गाडीतळ, येरवडा) असे अटक केलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. त्याचे दोन साथीदार फरार आहेत. राजेश लीलाधर म्हात्रे (वय ४६, रा. बेलापूर, नवी मुंबई) असे ठार झालेल्या प्रवाशाचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक चित्रा चौधरी यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात बर्निंग घाट परिसरात एकजण बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक चित्रा चौधरी यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी घटनास्थळी जाऊन राजेशला ससून रुग्णालयात दाखल केले. मात्र, तपासणीपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. तपास करताना रिक्षाचालक शादाफने राजेशला बुधवार पेठ परिसरात सोडण्यासाठी स्वारगेट येथून रिक्षात बसविले. त्यानंतर शादाफने दोन साथीदारांच्या मदतीने राजेशला बुधवार पेठेत न सोडता कुंभारवेस मार्गे कोरेगाव पार्कमधील बर्निंग घाटावर नेले.

राजेशकडील रक्कम काढून घेण्यासाठी शादाफसह इतर दोघांनी त्यांना आणखी दारू पाजली. त्यानंतर राजेशच्या खिशातील ४ लाखांची रोकड काढून घेत त्यांना बर्निंग घाट परिसरातील निर्मनुष्य ठिकाणी एकटेच सोडून तिघांनी पळ काढला. थंडी आणि मोठ्या प्रमाणात मद्यपान केल्यामुळे राजेशचा तिथेच मृत्यू झाला. याप्रकरणी आणखी दोघांचा शोध सुरू आहे.

PuneMirror - 20 January, 2019

# Cops crack murder mystery in 6 hours without single clue

**Based on 40-year-old's clothes, Bharati Vidyapeeth police searched 35 slums and 100 signals and talked to various hawkers; they found information at Gosavi Vasti**

MAHENDRA KOLHE











After finding Sunita Shelke's (below, extreme right) body near tunnel, (clockwise from left) the team gathered at police station and searched 100 signals like the one at Katraj Chowk and 25 slums Jncluding the one near Wonder City, Ambegaon and Katraj-Kondhwa road. They enquired with people over six hours on Thursday

Archana.More
@timesgroup.com
TWEET @Archana_Mirror

When cops attached to Bharati Vidyapeeth police station found a corpse of an unknown woman, they were puzzled due to the lack of information. There was dearth of technical support to commence the basic investigation even. And still, the squad of 14, comprising officers and constables, solved the mystery within six hours through a chain of human intelligence network. They searched 40 slums and visited 100 signals to identify the woman and reach the culprit.

The body of the 40-year-old woman was found near the Katraj tunnel on Mumbai-Bangalore Highway. It was difficult for the cops to identify the deceased since there was no proof; no identity or phone. Given the bleak circumstances, sub-inspector Mahendra Patil took the first clue from the kind of clothes the woman had worn — a tattered, dark colourful sari along with fake jewellery. The officer asked his team to visit all the slums in Pune and people at the signals who vend different items. On Thursday, the team of 14 cops started the investigation at 12 noon.

They employed the traditional inquiry skills, along with human intelligence. The team split in seven — two cops each — and scourged 35 slums like Waghjai, Anjalinager, Shaminager, Swargate, Sahakarnagar, Sinhagad, Dhayari, Narhe and so on. The teams talked to beggars, people selling balloon and other objects at the traffic signals.

Sub-inspector Patil told *Mirror* that they had to rely on intensive search as there were no closed-circuit television cameras on the route where the body was found. "We did not even find a single person who spotted the accused dumping the body while wrapped in a gunny bag," he said, adding, "When we discovered her, we noticed that she was typically dressed like a member of community that sells balloons or hawk chillies and lemons at traffic signals — 100 of which were visited by our staff. We showed them her picture. It was also taken to 40 other slums in jurisdiction of zones II and III. Finally, we found a senior citizen who identified the deceased."

Her identity was ascertained at Gosavi Vasti. She was Sunita Shelke. The locals also informed the cops that she was having an affair with the accused, who has been identified as Deepak Sukale (25). Police constables Harshal Shinde and Pranav Sankpal were told that the accused resided in Kapurhol village in Bhor Taluka. The duo, along with constables Bhushan Kote, Vinod Bhandalkar and Shridhar Patil went to the hamlet by 6 pm and nabbed Sukale, thus concluding the operation within six hours by using sheer skill and intelligence.

Further investigation was revealed the missing facts on the day Shelke was killed. She was in Kapurhol, where she had a spat with Sukale over money. Shelke was demanding some cash, which Sukale refused to hand over. It led to the ruckus in Sukale's locality. In a fit of rage, he beat her to death, wrapped her in a gunny bag and disposed it on the highway with help from his friend, Dharmendra Tadsare (38), a resident of Dhayari.

A case has been registered against Sukale under Indian Penal Code section 302 (murder) and sections 3, 4 (common intention).


**पुण्यनगरी** – दि. २१ जानेवारी, २०२०

# अमली पदार्थ विकणारे तिघे पकडले

। पुणे : प्रतिनिधी

अमली पदार्थांची विक्री प्रकरणात पोलिसांनी हडपसर, तसेच बिबवेवाडी भागात कारवाई करून तिघांना पकडले. त्यांच्याकडून तीन किलो गांजा आणि ३० हजार ५०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आला.

बिबवेवाडी परिसरातील गंगाधाम रस्त्यावर एक जण गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती गस्त घालणाऱ्या अमली पदार्थ विरोधी पथकातील कर्मचाऱ्यांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून आसिफ मज्जीद सातारकर (वय ३५, रा. लक्ष्मीनगर, कोंढवा) याला पकडले. त्याच्याकडून १ किलो ५५० ग्रॅम गांजा, तसेच रोकड असा ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक नीलेश महाडिक, मनोज शिंदे, प्रमोद



मगर, प्रवीण पडवळ, मंगेश पवार यांनी ही कारवाई केली.

दरम्यान, हडपसर भागातील सय्यदनगर परिसरात दोघे जण दुचाकीवरून थांबल्याची माहिती वानवडी पोलिसांना मिळाली. पोलिसांनी दुचाकीवरील दोघांना पकडले. दोघांकडे असलेल्या पिशवीची झडती घेण्यात आली. पिशवीत गांजा आढळून आला. याप्रकरणी रिझवान महमद नसीर शेख (वय २६, रा. हांडेवाडी रस्ता, हडपसर) आणि सलमान कलीम खान (वय २७, रा. सय्यदनगर, महंमदवाडी रस्ता, हडपसर) यांना अटक करण्यात आली. दोघांकडून दुचाकी आणि २ किलो ३२१ गांजा जप्त करण्यात आला. वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील, गुन्हे शाखेचे निरीक्षक सलीम चाऊस, उपनिरीक्षक अंकुश डोंबाळे, रमेश भोसले, महेश कांबळे यांनी ही कारवाई केली.

**लोकसत्ता** – दि. १५ जानेवारी, २०२०

# विद्यार्थिनीला लुटणारा गजाआड

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विधी महाविद्यालय रस्त्यावर राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी प्रशिक्षण संस्थेतील (एफटीआयआय) विद्यार्थिनीला धमकावून तिच्याकडील पिशवी हिसकावून नेणाऱ्या चोरट्याला गुन्हे शाखेने पकडले.

उबेद सलीम शेख (वय २५,रा. ११६०, कसबा पेठ) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. ४ जानेवारी रोजी तक्रारदार विद्यार्थिनी रात्री विधी महाविद्यालय रस्त्यावरुन जात होती. त्या वेळी शेखने तिला धमकावून तिच्याकडील पिशवी हिसकावून नेली होती. पिशवीत रोकड तसेच मोबाईल संच होता.

विद्यार्थिनीकडील पिशवी हिसकावून नेणारा चोरटा उबेद शेख मंगळवार पेठेत थांबल्याची माहिती गस्त घालणारे पोलीस नाईक श्रीकांत वाघवले आणि सुधाकर माने यांना मिळाली. त्यानंतर सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडे एक मोबाईल संच सापडला असून तो मोबाइल विद्यार्थिनीचा असल्याचे निष्पन्न झाले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण वायकर, उपनिरीक्षक उत्तम बुदगुडे, वाघवले, योगेश जगताप, माने, इरफान मोमीन, वैभव स्वामी यांनी ही कारवाई केली.

पुढारी – दि. २९ जानेवारी, २०२०

# सराईत वाहन चोरट्याला अटक, दोन लाखांच्या पाच दुचाकी जप्त

पुणे: पुढारी वृत्तसेवा

सराईत वाहन चोरट्याला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. अजय दत्तात्रय लवडे (वय.२४,रा.गोसाळे चाळ, उत्तमनगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या वेळी त्याच्या ताब्यातून दोन लाख दहा हजार रुपये किमतीच्या चोरीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

उपनिरीक्षक भूषण कोते हे त्यांच्या पथकासह हद्दीत पेट्रोलिंगवर असताना कर्मचारी गणेश चिंचकर व अभिजित जाधव यांना बातमीदारमार्फत बातमी मिळाली होती की, शहरातील विविध भागांतून दुचाकीची चोरी करणारा सराईत चोरटा अजय लवडे हा स्वामी नारायण मंदिर येथे दर्शनाला येणार आहे.

त्यानुसार निरीक्षक वसंत कुवर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक भूषण कोते, महेंद्र पाटील, कर्मचारी कृष्णा बडे, अभिजित रत्नपारखी, महेश मंडलीक, कुंदन शिंदे, सर्फराज देशमुख, राहुल तांबे यांच्या पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. यावेळी शहरातील विविध पोलिस ठाण्यातील वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.